# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 15/07/2021 (गुरूवार)

(सायंकाळ)

---

**देवलापार हत्याकांडातील आरोपींना 12 तासात केले जेरबंद**
**(स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण पोलीस पथकाची कार्यवाही)**

स्था.गु.शा. :– दि. 14/07/2021 रोजी देवलापार अंतर्गत येणाऱ्या ग्राम चारगाव (मौदी) येथील एका युवकाचा खून झाला असून त्याचा मृतदेह त्याच्या घरात पडून असल्याबाबत ग्राम चारगाव (मौदी) चे पोलीस पाटील श्री नंदकिशोर हिरालाल धुर्वे यांना माहिती मिळाली. त्यांनी चारगाव गाठले व घटनास्थळी जावून पाहीले असता मृतक क्रिष्णा बाबुलाल मसराम वय अं. 38 वर्ष हा त्याचे घरी लाकडी खाटेवर रक्ताच्या थारोळयात निपचीत पडून असल्याचे दिसून आला. मृतकाला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मानेवर व गळयावर धारदार शस्त्राने हल्ला करुन ठार केल्याचे प्रथमदर्शनी पोलीस पाटील श्री नंदकिशोर धुर्वे यांचे निदर्शनास आले. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता पोलीस स्टेशन देवलापार येथे घटनेची माहीती दिली. देवलापार पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री बोरकुटे यांनी तातडीने पोलीस स्टाफसह घटनास्थळ गाठले व सदर हत्याकांडाचे कारण व आरोपी कोण? याचा शोध घेण्यात सुरवात करुन घटनास्थळी कायदेशिर प्रक्रिया सुरु करुन मृतदेहास शवविच्छेदनाकरीता शासकीय रुग्णालयात पाठविले. याचदरम्यान सदर हत्याकांडाची माहिती नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला यांना समजल्याने त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात विशेष पथक तयार केले व सदर हत्याकांडा मागे काय उद्देश व आरोपी कोण? याचा शोध घेण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने आपल्या बातमीदारांना नागपूर ग्रामीण जिल्हा व नागपूर शहरात कार्यन्वीत केले व अज्ञात आरोपीचा शोध सुरु केला. दरम्यान त्यांना त्यांच्या मुखबिराने माहिती दिली की, ‘‘चारगाव येथील हत्याकांड मध्ये कामठी रोड येथील खसाळा येथे राहणाऱ्या दोन युवकांचा हात आहे.’’ स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कार्यान्वीत केलेल्या बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन विशेष पथकातील पोलीसांनी खसाळा येथे जावून मिळालेल्या माहिती संबधात गोपनियरित्या चौकशी केली असता त्यांना समजले की, प्रमोद बाबुलाल मसराम वय 35 वर्ष रा. नाका नं. 2, खसाळा, कामठी रोड, नागपूर याने त्याचा साळा अतुल क्रिष्णाजी पुराम वय 28 वर्ष रा. नाका नं. 2, खसाळा, कामठी रोड, नागपूर याचे मदतीने मृतक क्रिष्णा मसराम याची निर्घुन हत्या केली आहे. सदर हत्याकांडामागे त्याचा मुख्य उद्देश असा होता की, आरोपी प्रमोद मसराम याचा मोठा भाऊ मृतक क्रिष्णा मसराम हा त्यांची आई श्रीमती दशवंतीबाई मसराम हिला नेहमी निर्माण होणाऱ्या घरगुती वादातून अमानुषरित्या मारहान करीत असे. मृतक हा दारु पिण्याच्या सवयीचा असल्याने तो त्याच्या आईला शुल्लक कारणावरुन नेहमी त्रास दयायचा दि. 13/07/2021 रोजी मृतक क्रिष्णा याने त्याचे आईला गव्हाची मागणी केली. श्रीमती दशवंतीबाईने त्याला गहू देण्यास नकार दिला या शुल्लक कारणावरुन आई व मुलामध्ये वाद झाला. त्यांचे या वादावादीमध्ये मृतकाने दशवंतीबाईला मारहान सुरु केली त्यामध्ये ती गंभीररित्या जखमी झाल्याने तीला वैद्यकीय उपचाराकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र देवलापार येथे नेले दशवंतीबाई गंभीर असल्याने त्यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे हलविण्यात आले. सदर घटना दशवंतीबाईचा लहान मुलगा आरोपी प्रमोद मसराम याला समजताच त्याने त्याचा साळा अतुल पुराम याला सोबत घेतले व दि. 13/07/2021 रोजी रात्री 10.00 वाजता दरम्यान मोटरसायकलने चारगांव येथे जावून त्याचा मोठा भाऊ मृतक क्रिष्णा मसराम याला धारदार कुऱ्हाडीने वार करुन जिवे ठार केले. कौटूंबिक वादातून उध्दवलेल्या या हत्याकांडाचा छडा स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने अवघ्या 12 तासात लावून आरोपींना देवलापार पोलीसांचे स्वाधीन केले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर राऊत, पोलीस नायक दिनेश आधापूरे, नम्रता बघेल, पोलीस शिपाई अमोल वाघ, विपीन गायधने, रोहण डाखोरे आणि सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक जावेद शेख, पोलीस शिपाई सतिष राठोड यांचे विशेष पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर